# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल**

**क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.३०३/२०२१/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.देवेंद्र पंडीत पाटील<br>रा.२९, साईप्रसाद, श्रीकृष्ण कॉलनी, विद्यानगरी, देवपूर, धुळे.ता.जि.धुळे. | अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., धुळे शहर व ग्रामीण विभाग, विद्युत भवन, आयकर भवन समोर, साक्री रोड, धुळे ता.जि.धुळे. | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., धुळे शहर व ग्रामीण विभाग, विद्युत भवन, आयकर भवन समोर, साक्री रोड, धुळे ता.जि.धुळे. |

**<u>द्वितीय अपिल सुनावणी दि.३०/११/२०२३</u>**

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०९/०९/२०२० | १४/०९/२०२० | ०९/१०/२०२० | २३/१०/२०२० | २६/१०/२०२० | ०९/११/२०२० |

अपिलार्थी यांनी दि.१५/०१/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "अपेक्षित माहिती पूर्णपणे न मिळाल्याने" असे कारण नमूद करुन आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून अपिलार्थी अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०९/०९/२०२० रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "वैशाली राजन खरोटे, सहाय्यक अभियंता, महावितरण मर्या. शहर विभागीय कार्यालय धुळे यांच्या विविध ठिकाणी झालेल्या बदल्यांचे शासकीय आदेशांच्या छायांकित प्रती" इ. माहिती मागितली आहे.

४. याप्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज हा कोविड लॉकडाऊन कालावधीतील आहे. जन माहिती अधिकारी यांनी दि.०९/१०/२०२० च्या पत्रान्वये उपव्यवस्थापक (मासं-प्रभारी), शवग्रा विभाग, धुळे यांचेकडून दि.०६/१०/२०२० अन्वये प्राप्त झालेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. दि.०६/१०/२०२० च्या पत्रात असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे सदरची माहिती देता येऊ शकत नाही. तद्नंतर अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९/१२/२०२०

रोजी अपिलकर्ता यांच्या अर्जावियी माहिती एचआर सेक्शन कडून शक्य ती माहिती उपलब्ध करण्यासाठी पुढील १० दिवसांत देण्याची कार्यवाही करावी असे आदेश पारित केले आहेत. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि.१०/१२/२०२० च्या पत्रान्वये मानव संसाधन विभागाकडून उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या समजुतीप्रमाणे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने पुरविता येऊ शकत नाही असे कळविले होते मात्र प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर अपिलार्थीस दि.१०/१२/२०२० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.३०३/२०२१/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

जावक क्र. अपि.८२८ , दिनांक :- 04 APR 2024

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक